# लोकसत्ता प्रतिक्रिया

सहा वर्षे पूर्ण होण्यापूर्वीच पहिलीला प्रवेश देण्याचा विचार (लोकसत्ता २१ जाने. २०२०) शासनाचा शिक्षणविभाग विचार करीत असेल तर तो कायद्याचे उल्लंघन करणारा आणि अशास्त्रीय असा असेल; असा विचार त्यांनी पुढे रेटणे हे अयोग्य ठरणार आहे.

राष्ट्रीय परीक्षा, सैन्यभरतीच्या परीक्षा यांमध्ये मुलांचे एक वर्षाचे नुकसान होते, असे या निर्णयासाठी कारण दिले जाते; पण काही लाख मुले शाळेत जातात, त्यापैकी काही शे मुले अशा स्पर्धा परीक्षांकडे वळतात. त्यांचा फायदा व्हावा यासाठी उरलेल्या लाखो मुलांचे नुकसान करणे, याला लोकशाही वृत्ती म्हणत नाहीत. जे पालक अल्प वयात मुलांना शाळेत घालू इच्छितात ते आपल्या मुलांच्या बाबतीत स्वार्थांध तरी असतात किंवा त्यांना 'शिक्षण' कळत तरी नसते. त्यामुळे आपल्या मुलांना लवकर शिकवून आपण त्यांचा फायदा करीत आहोत असे मानताना ते अंतिमतः आपल्या मुलांचे नुकसानच करीत असतात.

शिक्षणहक्क कायदा करताना, शालेय प्रवेशाचे वय किती असावे, या विषयीचा शास्त्रीय व तुलनात्मक असा अभ्यास झालेला आहे. केंद्रीय शिक्षण मंडळ, या कायद्याला विसंगत असे वागत असेल तर त्यांच्यावर केंद्र सरकारने कारवाई करण्याचा आग्रह धरला पाहिजे. महाराष्ट्रापुरता 'सहा वर्षे पूर्ण' हा नियम पाळायला केंद्रीय शिक्षण मंडळाला आपण लावू शकतो; कारण २०१० साली महाराष्ट्राने (इतर राज्यांप्रमाणेच) स्वतःचा स्वतंत्र शिक्षणहक्क कायदा अंमलात आणला आहे. या कायद्याशी विसंगत अशी कृती करणे म्हणजे, बेकायदेशीर वागणे होय, आणि शिक्षण विभागाने असा चुकीचा पायंडा पाडू नये.

मुलांच्या प्राथमिक शाळेतील प्रवेशाच्या या विषयाला एक शास्त्रीय अंग आहे. ते आहे बालशिक्षणाचे शास्त्र. मुलांचे तीन ते सहा वर्षांपर्यंतचे वय हे बालशिक्षणाचे वय मानले जाते. या तीन वर्षांत, मुलांना लेखन-वाचन-गणन असा औपचारिक शिक्षणाचा श्रीगणेशा करणे, हे नेमकेपणाने व प्रत्यक्षपणे टाळायचे असते. कारण, या औपचारिक शिक्षणाच्या तयारीचे असे हे बालशिक्षण असते. शालेयपूर्व अशा या वयात, मूलतः मुलांच्या पुढील काळातील शिक्षणात लागणाऱ्या आणि पुढील जीवनात लागणाऱ्या क्षमतांची पायाभरणी व्हावी लागते. मुलांचा शारीरिक विकास, बौद्धिक विकास, भावनिक-सामाजिक विकास आणि भाषिक विकास अशा पायाभूत क्षमतांचा विकास पुरेशा प्रमाणात व्हावा लागतो. आणि जगभरच शिक्षणात त्यासाठी ही वर्षे राखून ठेवलेली आहेत. आपण जेव्हा शाळेतील प्रवेशाचे वय सहा महिन्यांनी कमी करतो तेव्हा, बालशिक्षणातील या क्षमता विकासासाठी असलेला हा पायाभूत संधींचा काळच सहा महिन्यांनी कमी करीत असतो, आणि हे मुलांच्या शैक्षणिक व अन्य भवितव्याच्या दृष्टीने नुकसान कारक ठरते.

जे पालक प्रवेशाचे वय कमी करण्याचा आग्रह धरतात त्यांची मुले बहुधा अशा शाळांतून जात असणार की जेथे, बालशिक्षणाचे मूलभूत तत्वज्ञान न अंगिकारता, तेथेही प्राथमिक शिक्षणाची तयारी म्हणून, क्षमता विकासाच्या उपक्रमांऐवजी, लेखन-वाचन-गणन या त्रयीचा भर न पेलणाऱ्या वयात, मुलांवर लादत

असतील. पालकांनी आग्रह धरला पाहिजे तो बालशाळांतून क्षमता विकासाच्या पुरेपूर संधी मुलांना प्राप्त होण्यावर परंतु हे शासनाचे काम नाही. त्याने ते करू नये. लाखो मुलांचे बालशिक्षणातील क्षमता विकासाचे सहा महिने हिरावून घेऊ नयेत !

❖